लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करीता लोकसभा मतदारसंघातील मतदारांना मतदानाच्या दिवशी मतदान करण्यासाठी सुट्टी देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**शासन परिपत्रक क्र. लोसानि-२०२४/प्र.क्र.२६/उद्योग-६,**
मंत्रालय, मुंबई-३२
दिनांक : २२ मार्च, २०२४.

**संदर्भ** :- १.भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ECI/PN/२३/२०२४, दि.१६ मार्च, २०२४ रोजीचे प्रसिद्धीपत्रक.
२. भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ७८/EPS/२०२४ दि.१६ मार्च, २०२४ रोजीचे पत्र.

**शासन परिपत्रक**

आपल्या देशाने लोकशाही पद्धती स्वीकारली असून १८ वर्षावरील नोंदणी झालेल्या सर्व नागरिकांनी प्रत्येक निवडणूकीमध्ये मतदान करणे अपेक्षित आहे. ही बाब लक्षात घेता लोकप्रतिनिधीत्व कायदा, १९५१ मधील कलम १३५(ब) नुसार मतदानाच्या दिवशी सर्वसाधारणपणे मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात येते किंवा काही ठिकाणी कामाच्या तासात योग्य ती सवलत देण्यात येते. मात्र गेल्या काही निवडणूकांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्था/आस्थापना इ. भरपगारी सुट्टी किंवा सवलत देत नाहीत. त्यामुळे अनेक मतदारांना त्यांच्या मतदानापासून वंचित रहावे लागते, जे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे.

२. भारत निवडणूक आयोगाने दि.१६ मार्च,२०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाव्दारे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ चा कार्यक्रम जाहीर केला आहे. सदर निवडणूकीचे मतदान राज्यात दि.१९ एप्रिल,२०२४, दि.२६ एप्रिल,२०२४, दि.०७ मे, २०२४, दि.१३ मे, २०२३ व दि.२० मे, २०२४ अशा पाच ५ टप्प्यात होणार आहे.

३. भारत निवडणूक आयोगाने निर्गमित केलेल्या आदेशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये परिशिष्ट-१ प्रमाणे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक घेतली जाणार आहे. या निवडणुकीमध्ये सर्व मतदारांना त्यांचा मतदानाचा हक्क योग्यरितीने बजावता यावा यासाठी खालील प्रमाणे आदेश देण्यात येत आहेत:-

(I) निवडणूक होणा-या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार/अधिकारी/कर्मचारी यांना, मग ते कामानिमित्त निवडणूक होणा-या क्षेत्राबाहेर कार्यरत असले तरीही, त्यांना निवडणूकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्यात यावी.

(II) सदर सुट्टी उद्योग विभागांतर्गत येणा-या सर्व उद्योग समूह, महामंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना, इत्यादींना लागू राहील.

(III) अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर, मतदान क्षेत्रातील कामगारांना मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी कमीत कमी दोन तासांची सवलत देता येईल. मात्र त्याबाबत संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत मतदारांना मतदानासाठी किमान दोन तासांची सवलत मिळेल याची दक्षता संबंधित आस्थापनांनी घेणे आवश्यक राहिल.

(IV) वर नमूद केल्यानुसार उद्योग विभागांतर्गत येणा-या सर्व महामंडळे, उद्योग समूह, कंपन्या व संस्थांमध्ये, औद्योगिक उपक्रम इत्यादींच्या आस्थापनांनी वरील सूचनांचे योग्य ते अनुपालन होईल याची काटेकोरपणे खबरदारी घ्यावी. मतदारांकडून मतदानाकरिता योग्य ती सुट्टी अथवा सवलत प्राप्त न झाल्याने मतदान करता येणे शक्य न झाल्याबाबत तक्रार आल्यास, त्यांच्याविरुद्ध योग्य कारवाई करण्यात येईल.

३. सदर परिपत्रक भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक क्रमांक ECI/PN/२३/२०२४, दि.१६ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकास आणि भारत निवडणूक आयोग यांचे क्रमांक ७८/EPS/२०२४ दि.१६ मार्च, २०२४ रोजीचे पत्र यांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३२२१७१०३६२८१० असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढ़ण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( शामकांत सोनवणे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-** उपरोक्त परिपत्रक सर्व संबंधित आस्थापनांच्या निदर्शनास आणण्याच्या विनंतीसह अग्रेषित.

१. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई-३२
२. मा. प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी मंत्रालय ,मुंबई.
३. विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य व खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ मर्या, मुंबई.
७. व्यवस्थापकीय संचालक ,महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
८. संचालक, शासकीय मुद्रण लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय, मुंबई.
९. व्यवस्थापकीय संचालक, सिकॉम लि. बिल्डींग क्र.४, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क, गुरू हरगोविंदजी रोड, चकाला, अंधेरी, (पुर्व), मुंबई.
१०. उद्योग समूह FICCI, MCCA, CMIA.
११. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, महाराष्ट्र राज्य.
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांना व्यापक प्रसिद्धी देण्याच्या विनंतीसह अग्रेषित.
१४. उद्योग विभागातील सर्व कार्यासने.
१५. निवड नस्ती(उद्योग-६).

**********************

शासन परिपत्रक क्र.लोसानि-२०२४/प्र.क्र.२६/उद्योग-६ दि.२२/०३/२०२४ सोबतचे परिशिष्ट-१

| मतदानाचे टप्पे | मतदानाचा दिनांक | लोकसभा मतदार संघाचे नाव |
|---|---|---|
| पहिला टप्पा | १९ एप्रिल,२०२४ | ९- रामटेक, १०-नागपूर, ११-भंडारा-गोंदिया, १२-गडचिरोली-चिमूर, १३-चंद्रपूर |
| दुसरा टप्पा | २६ एप्रिल, २०२४ | ५-बुलढाणा, ६-अकोला, ७-अमरावती, ८-वर्धा, १४-यवतमाळ-वाशिम, १५-हिंगोली, १६-नांदेड, १७-परभणी |
| तिसरा टप्पा | ७ मे, २०२४ | ३२-रायगड, ३५-बारामती, ४०-उस्मानाबाद, ४१-लातूर, ४२-सोलापूर, ४३-माढा, ४४-सांगली, ४५-सातारा, ४६-रत्नागिरी-सिंधुदूर्ग, ४७-कोल्हापूर, ४८-हातकणंगले |
| चौथा टप्पा | १३ मे, २०२४ | १-नंदुरबार, ३-जळगाव, ४-रावेर, १८-जालना, १९-औरंगाबाद, ३३-मावळ, ३४-पूणे, ३६-शिरूर, ३७-अहमदनगर, ३८-शिर्डी, ३९-बीड |
| पाचवा टप्पा | २० मे, २०२४ | २-धुळे, २०-दिंडोरी, २१-नाशिक, २२-पालघर, २३-भिवंडी, २४-कल्याण, २५-ठाणे, २६-मुंबई उत्तर, २७-मुंबई उत्तर-पश्चिम, २८-मुंबई उत्तर पूर्व, २९-मुंबई उत्तर मध्य, ३०-मुंबई दक्षिण मध्य, ३१-मुंबई दक्षिण |